आर बी आय/२००६-०७/९२
ए.पी. (डीआयआर सिरीज) परिपत्रक क्र. ४

२८जुलै,२००६

प्रति,

सर्व वर्ग १ अधिकृत व्यावसायिक बँका

महोदया/ महोदय

**परदेशी गुंतवणुकदार संस्थांच्या (एफ आय आय) उपक्षेत्रांमधील गुंतवणुक व्यवहारांचा समांतर दर्जा राखण्याबाबत**

अधिकृत व्यावसायिक वर्ग १ (एडी) बँकांनी परकीय विनिमय व्यवस्थापन (फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट) (परदेशी प्रतिभूतीचे हस्तांतरण किंवा प्रदान) अधिनियम २००४ नोटीफिकेशन नं. फेमा १२०/आरबी-२००४ दि. ७ जुलै २००४ व परकीय विनिमय व्यवस्थापन (फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट) (भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तिकडून, प्रतिभूती हस्तांतरण किंवा प्रदान) अधिनियम, २००० नोटीफिकेशन नं. फेमा २०/२०००-आरबी दि. ३ मे २०००, ज्यामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी दुरुस्ती केल्या आहेत त्याचा संदर्भ घ्यावा.

२ भारत सरकार व सेबी (सिक्युरिटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) यांच्या झालेल्या चर्चेअंती असा निर्णय झाला आहे की, परदेशी गुंतवणुकदार संस्थांच्या (एफआयआय) उपक्षेत्रांमध्ये **गुं**तवणुकीसाठी स्वतंत्र परदेशी प्रतिभूतींना, भारतीय स्टॉक एक्सचेंजच्या एएए दर्जाच्या, समांतर दर्जा देण्यात येईल. यासाठीची कार्यप्रणाली सेबीकडून जाहीर करण्यात येईल. त्यानंतर रिझर्व्ह बँक-परकीय विनिमय विभाग, केंद्रीय कार्यालय मुंबई ४०००01 यांच्याकडे, भारतातील अधिकृत स्टॉक एक्सचेंजनी परकीय विनिमय व्यवस्थापन कायदा १९९९ प्रमाणे आवश्यक, विविक्षित मान्यतांसाठी संपर्क साधावा.

३ परकीय विनिमय व्यवस्थापन (फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट) (भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तिकडून, प्रतिभूती हस्तांतरण किंवा प्रदान) अधिनियम, २००० नोटीफिकेशन नं. फेमा २०/२०००-आरबी दि. ३ मे २०००, मध्ये केलेल्या दुरुस्त्या वेगळ्या जारी करण्यात येतील.

४ एडी बँका, हे परिपत्रक आपल्या कायदे सल्लागार व ग्राहकांच्या निदर्शनास आणू शकतील

५ या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना ह्या, परकीय विनिमय व्यवस्थापन (फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट) कायदा १९९९ (१९९९ मधील ४२) च्या सेक्शन १०(४) व ११(१) नूसार देण्यात आल्या असून, अन्य कायद्यांतर्गत आवश्यक परवाने व मंजूरी प्रक्रियांना त्यामुळे बाधा येऊ शकणार नाही.

**आपला विश्वासु**
**सलीम गंगाधरन**
**चिफ जनरल मॅनेजर**
**इन-चार्ज**